**"वेतकाम" दरनिश्चितीस मुदतवाढ**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय,**
**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

आदेश क्रमांक उसं/अंध अपंग/२०१२-१३/दरनिश्चितीस/मुदतवाढ/(३८)/२०१५/बी- १७३०
-3 MAR 2016

**वाचा** १. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रं.भांखस/१०८८/२५१२/उ-६, दि.०२/०१/१९९२

२. उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्रं.भांखस/दरनिश्चिती/वेतकाम/(०४)/२०१२-२०१३/सी-७८९८, दि.०८/०८/२०१२

३. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रं.भांखस-२०१२/प्र.क्र.७९/उद्योग-४,दि.०३/०३/२०१४

४. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रं.उद्योग २०१४/प्र.क्र.८३/उद्योग-४,दि.०४/०८/२०१४

५. उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्रं.भांखस/दरनिश्चिती/खुर्च्या दुरुस्ती/(२५)/२०१४-२०१५/बी-८१५२, दि.२६/०८/२०१४

६. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र.८३/उद्योग-४,दि.०१/१२/२०१५

७. उद्योग संचालनालयाचे आदेश क्र. उसं/अंध अपंग/२०१२-१३/दरनिश्चितीस/मुदतवाढ/(३८)/२०१५/ बी-१३२७४, दि.०७/१२/२०१५

८. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे ज्ञापन क्र.भांखस-२०१६/प्र.क्र५४/उद्योग-४,दि.२४/०२/२०१६

उद्योग संचालनालयाने अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्थांना सन २०१२-२०१३ साठी शासकीय विभागांना वेतकाम करण्यासाठी आदेश क्रं.भांखस/दरनिश्चिती/वेतकाम/(०४)/२०१२-२०१३/सी-७८९८, दि.०८/०८/२०१२ नुसार दरनिश्चिती दिली होती.

ज्याअर्थी, शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.३, ४ व ६ अन्वये सन २०१२-२०१३ च्या दरनिश्चितीस अनुक्रमे दि.३०/०६/२०१४, दि.३०/०६/२०१५ व दि.३१/१२/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेशित केले होते. आता, उपरोक्त संदर्भ क्रं.८अन्वये, शासनाने पुन्हा सन २०१२-२०१३ च्या दरनिश्चितीस दि.३०/०६/२०१६ किंवा सुधारित दरनिश्चिती होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेशित केले आहे.

त्याअर्थी, शासकीय कार्यालयांना वेतकाम करण्यासाठी अंध व अपंग यांच्या संस्थांना सोबत जोडलेल्या सन २०१२-२०१३ च्या दरसूची नुसार "वेतकाम" दरनिश्चितीमध्ये कोणतीही वाढ न करता, दरनिश्चितीस दि.३०/०६/२०१६ किंवा सुधारित दरनिश्चिती होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर दरनिश्चिती पत्रकातील दर व अटीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता,**

प्रति,
१) मे. दिपक इंडस्ट्रीयल को. ऑप. सोसायटी लि., दुकान नं एम जी - ५४, वत्सलाताई नाईक नगर, श्री. राजेश्वर मेडिकल समोर, स.गो. बर्वे मार्ग, चेंबुर, मुंबई ४०००७१.

D:\अंध व अपंग\अंध व अपंग मुदतवाढ.docx

२) मे. महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, २/बी/४०८, इंदिरा गांधी गृहनिर्माण रहिवाशी संघ, प्रो. अनंत कानेकर मार्ग, प्रकाशगड जवळ, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.

३) मे. ब्लाईंड मेन्स इंडस्ट्रियल को.ऑप.प्रोडयुसर्स सोसायटी लि. १ चव्हाण भवन कंपाऊंड, स्टेशन रोड, विक्रोळी, मुंबई ४०००८३.

४) मे. दि नॅशनल सोसायटी फॉर दि वेल्फेअर ऑफ दि फिजिकली हॅन्डीकॅप्ड, बीबी-१२, राजदर्शन, दादा पाटीलवाड, प्लॅटफॉर्म क्र.१ जवळ, ठाणे.

५) कक्ष अधिकारी (उद्योग-४), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

"वेतकामाचे" दर निश्चितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय,**
**मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना,**
**नवीन प्रशासन भवन, मुंबई- ४०० ०३२.**

**परिपत्रक क्रमांक भाखस/दरनिश्चिती/वेतकाम/(०४)/२०१२-२०१३/** भी - ७१८८

दिनांक :- 8 AUG 2012

**वाचा :- १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखसं-१०८८/ (२५१२)/उ-६, दि. ०२/०१/१९९२.**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समिती निर्णय क्र.०६, बैठक दि. २६/०७/२०१२.**

शासन निर्णय दिनांक ०२/०१/१९९२ मधील परिशिष्ट पाच नुसार शासन अंगीकृत व्यवसाय, अंध-अपंग संस्था /सेवाभावी संस्था यांचेकडून कामे करुन घ्यावयाच्या/उत्पादन होणाऱ्या वस्तूंचे मालाचे/कामांचे दरनिश्चित करण्याचे काम मध्यवर्ती भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णय दिनांक ०२/०१/१९९२ च्या परिशिष्ट- ५ (क) मध्ये १) मे. दिपक इंडस्ट्रियल को ऑप. सोसायटी लि., ३८/१०६२, नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४, २) मे. ॲम्बिशिअस ब्लाईंड इंडस्ट्रियल को. ऑप. प्रोडयुसर्स सोसायटी लि., बिल्डींग नं. १५७, रुम नं. ४८५७, कन्नवार नगर, नं.१, विक्रोळी (पूर्व), मुंबई- ४०० ०८३, ३) मे. दि स्किल्ड ब्लाईड मेन्स इंडस्ट्रियल को. ऑप. प्रोडयुसर्स सोसायटी लि., ओ-४०४, प्रिन्स कास्टल बिल्डिंग, सेंट जोसेफ चर्चच्या बाजूला, स्टेशन रोड, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०७९, ४) मे. महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था लि., २/बी/४०८, इंदिरा गांधी गृहनिर्माण रहिवाशी संघ, प्रो. अनंत कानेकर मार्ग, प्रकाश गड जवळ, बांद्रे (पूर्व), मुंबई- ५१, ५)मे. ब्लाईड मेन्स् इंडस्ट्रियल को. ऑप. प्रोडयुसर्स सोसायटी लि., १ चव्हाण भवन कंपाऊंड, स्टेशन रोड, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३, ६) मे. दि एम. एन. बाणाजी इंडस्ट्रिज होम फॉर दि ब्लाईड, (Chateau Dieu) २८०, एस. व्ही. रोड, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई-४०० १०२, ७) मे. दि एन. एस. डी. इंडस्ट्रियल होम फॉर दि ब्लाईंड, बी. डी. डी. चाळ क्र. ५२, वरळी, मुंबई-४०० ०१८, ८) दि नॅशनल सोसायटी फॉर दि वेलफेअर ऑफ दि फिजिकली हॅन्डीकॅप, बीबी — १२, राजदर्शन, दादा पाटीलवाडी, प्लॅटफॉर्म क्र.१ जवळ, ठाणे, ९) मे. नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड (महाराष्ट्र) प्लॉट नं. बी-७२, एनआयसीई एरिआ, एम आय डी सी सातपुर, नाशिक, ४२२००७ या संस्थांना **"वेतकाम"** या बाबीसाठी आरक्षण देण्यांत आलेले आहे.

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दिनांक २६/०७/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत **संस्थांकडुन प्राप्त झालेल्या वेतकाम या बाबीच्या प्रस्तावावर** चर्चा करुन सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता खालील प्रमाणे दरनिश्चिती बांधिल करण्याचा निर्णय घेतला.

(६)

| अनु. क्र. | बाबीचे नाव | उत्पादित बाबीचे विनिर्देश | सन २०१२-२०१३ सालाकरीता दरनिश्चितीचे दर (रुपये) |
|---|---|---|---|
| | | केन साईज जाडी X रुदी | |
| १. | वेतकाम १००० चौ. से.मी. | ०.५ एमएम X २.०० एमएम | ४२.०० |

**वरील तक्त्यात दिलेले दर दिनांक ३० जून २०१३ पर्यंत ग्राह्य राहतील.**

**अंध व अपंग यांची धर्मादाय संस्था यांनी अंध व अपंग व्यक्तींकडूनच शासकीय कार्यालयांनी दिलेले काम पूर्ण करुन घ्यावे.**

**कार्य कालावधीः-** कार्य आदेश मिळाल्यापासून **६** आठवडयाच्या आत सर्व कामे पूर्ण करणे आवश्यक राहील.
**देय रकमेबाबतच्या अटीः-** मागणीकाराला कार्यादेश दिलेली काम पूर्ण झाल्यानंतर ९० टक्के रक्कम दोन आठवडयामध्ये द्यावयाची आहे व उर्वरित १० टक्के रक्कम सर्व कामे समाधानकारक व विनिर्देशाप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत करणे आवश्यक आहे. कार्य कालावधी मध्ये काम पूर्ण न झाल्यास उशिरा केलेल्या कामाच्या किंमतीवर ०.५ टक्के प्रती आठवडयाप्रमाणे दंड मागणीकारामार्फत आकारला जाईल, व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे असेल.

(अ) विहीत कार्य कालावधीमध्ये पुर्ण न केलेल्या कामांची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० टक्के दंड आकारला जाईल.

(ब) विहीत कार्य कालावधीमध्ये पूर्ण न केलेल्या कामांची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५ टक्के दंड आकारला जाईल.

सदर दर हे खालील संस्थांपुरतेच मर्यादित असून त्यांना महाराष्ट्रात कोठेही हया दराने काम करण्याची मुभा आहे आणि वरील दरात सर्व कर समाविष्ट आहेत.

**सदरील दंडाची वसूली करण्यांची संपूर्ण जबाबदारी मागणीकाराची असेल.**

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.**

प्रति -

१) मे. दिपक इंडस्ट्रियल को. ऑप. सोसायटी लि., ३८/१०६२, नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.

२) मे. ॲम्बिशिअस ब्लाईड इंडस्ट्रियल को. ऑप. प्रोडयुसर्स सोसायटी लि., बिल्डींग नं. १५७, रुम नं. ४८५७, कन्नवार नगर, नं.१, विक्रोळी (पूर्व), मुंबई- ४०० ०८३.

३) मे. दि स्किल्ड ब्लाईड मेन्स इंडस्ट्रियल को. ऑप. प्रोडयुसर्स सोसायटी लि., ओ-४०४, प्रिन्स कास्टल बिल्डिंग, सेंट जोसेफ चर्चच्या बाजूला, स्टेशन रोड, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०७९.

४) मे. महाराष्ट्र अंध औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था लि., २/बी/४०८, इंदिरा गांधी गृहनिर्माण रहिवाशी संघ, प्रो. अनंत कानेकर मार्ग, प्रकाश गड जवळ, बांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

५) मे. ब्लाईड मेन्स् इंडस्ट्रियल को. ऑप. प्रोडयुसर्स सोसायटी लि., १ चव्हाण भवन कंपाऊंड, स्टेशन रोड, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-०८३.

६) मे. दि एम. एन. बाणाजी इंडस्ट्रिज होम फॉर दि ब्लाईड, Chateau Dieu, २८०, एस. व्ही. रोड, एम. एन. बाणाजी इंडस्ट्रिज होम फॉर दि ब्लाईड जवळ, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई-४०० १०२.

७) मे. दि एन. एस. डी. इंडस्ट्रियल होम फॉर दि ब्लाईड, बी. डी. डी. चाळ क्र. ५२, वरळी, मुंबई-४०० ०१८.

८) मे. दि नॅशनल सोसायटी फॉर दि वेलफेअर ऑफ दि फिजिकली हॅन्डीकॅप, बीबी – १२, राजदर्शन, दादा पाटीलवाडी, प्लॅटफॉर्म क्र.१ जवळ, ठाणे,

९) मे. नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईड (महाराष्ट्र) प्लॉट नं. बी-७२, एनआयसीई एरिआ, एम आय डी सी सातपुर, नाशिक, ४२२००७